# पोलीस अधीक्षक कार्यालय,वजिराबाद चौक नांदेड

EMAIL ID:- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com



**प्रेसनोट** दिनांक—08.11.2025

## सिटी स्ट्रिट सेफ्टी पथक यांची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे इसमांवर धडक कारवाई..

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने मा. **श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख **सपोनि श्री भागवत नागरगोजे** व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक 6 व 7 नोव्हेंबर 2025 रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे इसमांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

1) **पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक तिन मधील पोलीस अंमलदार यांना एम.आय.डी.सी येथे चार इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

2) **पोलीस स्टेशन भाग्यनगर :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना किनवट वाईन शॉप येथे एक इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

3) **पोलीस स्टेशन विमानतळ :–** सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक दोन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान नमस्कार चौक येथे एक इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

4)**दामिनी पथक :–** दामिनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्याण बर्की चौक,यशवंत कॉलेज,फार्मशी कॉलेज, येथे 08 इसम हे आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळुन आल्याने त्यांचेवर पो स्टे शिवाजीनगर,इतवारा,भाग्यनगर येथे कलम 110/117 म.पो.का. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा संबंधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड